


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ




❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ७७ वा ❑ भारतीय सौर दिनांक ११ वैशाख शके १९४८, शुक्रवार दि.०१ मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## महाराष्ट्र मराठी माणसाच्या अस्मितेचे, शौर्याचे आणि एकतेचे प्रतीक आहे.

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

१ मे १९६० रोजी झालेली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही खरोखरच मराठी माणसाच्या अखंड संघर्षाची आणि अढळ ध्येयाची सुवर्ण पहाट होती.१०५ हुतात्म्यांचे बलिदान आणि लक्षावधी लोकांच्या आंदोलनातून हे स्वप्न सत्यात उतरले, ज्यामुळे मराठी भाषिक संस्कृतीला स्वतःचे हक्काचे व्यासपीठ मिळाले.

आज हा दिवस केवळ एक सुट्टी नाही, तर महाराष्ट्राच्या देदीप्यमान इतिहासाचे स्मरण आणि प्रगतीच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

१ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणूनही ओळखला जातो, जो महाराष्ट्रात सुट्टीचा दिवस असतो. महाराष्ट्र राज्य हे मराठी माणसाच्या अस्मितेचे, शौर्याचे आणि एकतेचे प्रतीक आहे.

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून, ती संस्कृती, परंपरा आणि अस्मितेची जिवंत ओळख आहे.

एकता आणि संस्कृती: १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, जी मराठी एकतेचे एक मोठे उदाहरण आहे.महाराष्ट्रातील गडकिल्ले, जसे की रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, हे आपल्या इतिहासाची आणि अस्मितेची साक्ष देतात, ज्यांना युनेस्को () जागतिक वारसा नामांकन यादीत समाविष्ट करण्याचा मान मिळाला आहे. महाराष्ट्राने महात्मा फ ुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारखे थोर समाजसुधारक देशाला दिले आहेत, ज्यांचे विचार सामाजिक एकतेचा पाया आहेत.

१ मे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनानंतर मुंबईसह स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी लढा देताना १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक प्रांतीय राज्य मुंबई प्रांतात विलीन करण्यात आली. त्यावेळी मुंबई प्रांतात गुजराती आणि मराठी भाषा बोलणारे लोक राहत होते. त्याचवेळी भाषावार प्रांत रचनेची मागणी जोर धरु लागली. गुजराती भाषिकांनी स्वत:चं वेगळं राज्य हवं होतं. त्याचवेळी मराठी भाषिक नागरिकही स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलनं झाली. या आंदोलनाचा परिणाम म्हणून १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायद्याअंतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली.

२१ नोव्हेंबर १९५६ रोजी फ्लोरा फाउंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते. कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले होते, त्यामुळे मराठी माणसे चिडली होती. सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनासमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले.

त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून आणि दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. मोर्चा पोलिसांची ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र अढळ सत्याग्रहींमुळे पोलिसांचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले.

या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे आणि मराठी माणसाच्या आंदोलनामुळे अखेर सरकारने नमते घेऊन १ मे, १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर १९६५ मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आज ६६ वर्ष झाली. महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले.या ६५-६६ वर्षात महाराष्ट्राने अनेक चढ उतार बघितले व नेत्रदीपक उंची गाठली.

महाराष्ट्र राज्याने औद्योगिक, सामाजिक, आर्थिक आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात दैदीप्यमान प्रगती केली आहे. गेल्या ६५ वर्षांत राज्याने कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण आणि नागरी विकासात देशात अग्रस्थान मिळवले आहे.

महाराष्ट्र हे भारताचे आर्थिक इंजिन मानले जाते. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत राज्याने १,३९,४३४ कोटी रुपयांची सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे, जी गेल्या १० वर्षांतील उच्चांक आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक आणि व्यापारी राजधानी असून, मुंबई शेअर बाजार आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथेच आहेत.

देशाच्या सकल औद्योगिक उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १३% आहे. पायाभूत सुविधा आणि दळणवळण क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे

राज्यात महामार्ग, मेट्रो आणि एक्सप्रेसवेचे जाळे विणले त आहे. समृद्धी महामार्ग (नागपूर-मुंबई सुपर एक्सप्रेसवे - ५५,३३५ कोटी रुपये) हा पायाभूत सुविधांमधील एक मैलाचा दगड आहे. २२ किमीचा मुंबई ट्रान्स हार्बर लिंक ( - अटल सेतू) हा २२,८४० कोटी रुपयांचा प्रकल्प दळणवळणात क्रांती घडवत आहे.

पुणे, मुंबई आणि नागपूरमध्ये मेट्रो प्रकल्प वेगाने पूर्ण होत आहेत. औद्योगिक क्षेत्रात राज्य स्टार्टअप्स आणि उत्पादनात अग्रेसर आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर आणि औरंगाबाद हे औद्योगिक पट्टे विकासाचे प्रमुख केंद्र आहेत.

ऑटोमोबाईल, आयटी, आणि सेवा क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे.

राज्याच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा मोठा वाटा असून, ग्रामीण भागात विकासासाठी सिंचन प्रकल्प (३२ मोठे, १८६ मध्यम) पूर्ण करण्यात आले आहेत. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात नवा उच्चांक गाठला आहे.महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% असून, उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षणामध्ये राज्य आघाडीवर आहे. महाराष्ट्राची संस्कृती,प्रगती आणि निसर्ग पुढच्या पिढीसाठी जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.यासाठी आपण सर्वांनी मिळून महाराष्ट्राचे सौंदर्य हे निसर्ग, संस्कृती आणि इतिहासाचा एक सुरेख संगम आहे. ते जोपासण्यासाठी आपण सर्व मिळून पुढाकार घ्यायला पाहिजे.

महाराष्ट्राचे सौंदर्य जोपासण्यासाठी

सह्याद्रीच्या रांगा, कोकण किनारपट्टी आणि जंगले (उदा. ताडोबा, पेंच) यांसारख्या निसर्गसंपदा आहे . या निसर्ग संपादकांचे आपण रक्षण करु या.प्लास्टिकमुक्त पर्यटन करू या

किल्ले (उदा. प्रतापगड, रायगड) आणि ऐतिहासिक वास्तू (अजिंठा-वेरूळ लेणी) यांवर काहीही लिहिणे किंवा घाण करणे टाळायाला शिकु या. इतिहासाची स्वच्छता राखा.

कला आणि संस्कृतीचे जतन: लोककला, पारंपरिक सण (गणेशोत्सव, शिमगोत्सव) आणि स्थानिक परंपरांना प्रोत्साहन देऊ या

स्थानिक संस्कृतीला पाठिंबा देऊ या,स्थानिक खाद्यपदार्थ (वडापाव, मिसळ, कोकणी पदार्थ) आणि कारागिरांच्या वस्तू (वारली पेंटिंग, पैठणी) खरेदी करून लोकलला बळ देऊ या.पर्यटन स्थळांवर जाताना स्वच्छता बाळगा आणि इतरांनाही त्याबद्दल जागरूक करू या.

१ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणूनही ओळखला जातो, जो महाराष्ट्रात सुट्टीचा दिवस असतो. महाराष्ट्र राज्य हे मराठी माणसाच्या अस्मितेचे, शौर्याचे आणि एकतेचे प्रतीक आहे.गडकिल्ले, नैसर्गिक सौंदर्य,मराठी भाषा, आणि शिवरायांचा आदर्श या गोष्टी महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे आधारस्तंभ आहेत.

''जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!''.

# अभिजात मराठीचा आविष्कार सुलेखनातून व्हावा-योगेश सोमण

ज्योतिर्मय साहित्य

पुणे -श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड आणि अक्षर रसिक सुलेखन वर्ग, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सुलेखन स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. पुणे येथील भावे स्कूलमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर रामदासी वाङ्मयाच्या संशोधिका-लेखिका मनीषा बाठे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

दासबोध जयंतीनिमित्त सज्जनगड संप्रदाय अधिकारी सु. ग. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली शैलेश जोशी यांनी या सुलेखन स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते. या स्पर्धेत ३४ शाळांमधील २० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमात स्पर्धे तील विजेते विद्यार्थी, त्यांचे शिक्षक आणि सहभागी शाळांना गौरविण्यात



आले. शैलेश जोशी यांनी प्रास्ताविक केले, तर पल्लवी जोशी यांनी आभार मानले.

मनीषा बाठे यांनी रामदासी परंपरेतील विचारांचे महत्त्व आणि तरुण पिढीने या परंपरेशी जोडले जाण्याची गरज अधोरेखित केली. त्या म्हणाल्या, समर्थ रामदास यांनी सुंदर व शुद्ध लेखन पद्धतींचा विचार मांडला आहे. त्यांनी सांप्रदायाच्या ज्ञानमार्गी रचनेत भारतातील अनेक पंथ, सांप्रदायिकांच्या ग्रंथाभ्यासाचा पायंडा घालून दिला आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, आज रामदासी दफ्तरात दासबोधाच्या बरोबरीने ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, जगद्गुरू तुकारामांची गाथा आणि अनेक वारकरी संतांच्या अभंगांचा साठा आढळतो. समर्थांच्या त्या ज्ञानोपासक साक्षेपी संघटनाचा प्रत्यय आजही आठ राज्यांतून १३५ मठांतून येतो. या योगदानाचा उपयोग करून आता समर्थांच्या ज्ञानोपासक चळवळीचे सामर्थ्य दाखविण्याची आज गरज आहे.

प्रमुख पाहुणे योगेश सोमण यांनी सुलेखन स्पर्धा उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, चांगले हस्ताक्षर हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे. त्यासाठी परिश्रम केले पाहिजेत. आपल्या कारकिर्दीत चांगल्या अक्षराचा फायदाच होतो. चांगल्या हस्ताक्षरातून व्यक्त व्हायला शिकले पाहिजे. अभिजात मराठीचा आविष्कार सुलेखनातून व्यक्त झाला पाहिजे. सुलेखनाचा सराव करून त्यात प्रगत आणि उन्नत झाले पाहिजे.कार्यक्रमाला श्री रामदास स्वामी संस्थानचे प्रतिनिधी कौस्तुभ जोशी, मधुरा वाघ, मृणाल ब्रह्मे, योगिनी गोखले यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी ''महाराष्ट्र'' बोलतोय

ज्योतिर्मय साहित्य

हो, हो, मी तोच महाराष्ट्र जो संत महात्म्यांच्या आचार-वीचारांनी सजला आहे. होय ! मी तोच महाराष्ट्र बोलतो आहे. ज्यांच्यामुळे मी घडलो. माँ. जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी, माता रमाई, हिरकणी अशा कित्येक स्त्री विरांगना होऊन गेल्या त्यांच्यामुळे ''महाराष्ट्र'' ही माझी ओळख पडली. मला बोलायचंय तुम्हा सर्वांशी. कृपया ऐकून घ्या. अरे ! अरे ! काय हाल केलीये रे माझ्या शिवबाच्या महाराष्ट्राची?. काय महाराष्ट्र होता माझ्या शिवबाच्या काळात. घनदाट जंगले, सुंदर वनराई, सुरक्षित लेकीबाळी-स्त्रिया, माणसातली माणुसकी, सुखः, शांती, समाधान. माझ्या शिवबाच्या साम्राज्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जातीधर्मातील स्त्री जात सुखाःने, गुण्या गोविंदाने नांदत होती. मायबापाला आपल्या लेकीबाळींची कसलीच चिंता नव्हती. कारण, त्या समस्त लेकीबाळींची काळजी वाहणारा एकटा माझा शिवबा होता रे.

पण, माझ्या शिवबानंतर आज माझ्या शिवबाच्या महाराष्ट्राची काय हाल केलीये तुम्ही. सांगा, आज याच महाराष्ट्रात मुली वा स्त्रीया स्वतंत्रपणे जगतायत का? कसलीच भीती न बाळगता त्या पोरीबाळी रात्री सात पर्यंत तरी घराबाहेर फिरू शकतात का? आहे याचं उत्तर. अरे, तुमच्याकडे कसं असेल उत्तर?.




कारण, प्रश्नचिन्ह तुम्हीच तर निर्माण करता आहात. ना माता, ना भगिनी, ना दोन ते चार वर्षाची कोवळी चिमुरडी कोणीच सुरक्षित नाहीये आज. स्त्रीयांचा आदर तर तुम्हा लोकांना कदाचित माहितीच नसावा.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते,रमन्ते तत्र देवता:

यत्रेतास्तु न पूज्यन्ते, सर्वास्तत्राफला: क्रिया:

स्त्री महती सांगणारा या श्लोकाचा किती गहण अर्थ आहे. माहितीये का. मग याप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीत तुम्ही आचरण करता का? विचारा प्रश्न स्वतःला. अरे, आपण स्त्रीला लक्ष्मी स्वरूप मानतो. पण त्याच लक्ष्मी स्वरूप माता-भगिनींची तुम्ही काळजी घेता का?. रोज रोज बलात्कार होतायत. त्यांचा आकांत, आक्रोश ऐकायला येत नाही का?. आया-बहिणींची गय करा. त्यांचा सम्मान करा, त्यांचा आदर करा, त्यांना मान द्या. प्रत्येक स्त्रीला मान-सन्मानाने, ताठ मानेने जगू द्या. त्या नाजूक कळ्यांना उमलण्याआधी कुस्करू नका. वासनेच्या किळसवाण्या नजरेने कोणत्याच स्त्रीकडे बघु नका. कारण, जेव्हा स्त्री रडते तेव्हा माझा शिवबाही रडतो रे. त्या माता-भगिनींची हाल बघून.

अनंत कळा, यातना, वेदना, त्रास हसत सहन करुन ज्या आईने तुम्हाला जन्म दिला त्याच आईवरून तुम्ही गलिच्छ आणि जीव पिळवटून टाकणारी शिवीगाळ करता. अरे, कधी थांबवाल हे सगळं. तुम्हाला वाटत असेल की, एवढ्या रखरखत्या उन्हाळ्यात पाऊस का पडतोय?. अरे, तो पाऊस नाही. ते तर माझ्या शिवबाचे अश्रू आहेत. मेघ गर्जना करत माझा शिवबा ढसाढसा रडतोय रे.

तुम्ही थाटाममाटात माझ्या शिवबाची जयंती साजरी करता. पण, केवळ तो एकच दिवस तुम्ही माझ्या शिवबा राजाला स्मरता, माझ्या शिवबाची थोरवी गाता, विविध कार्यक्रम, सन्मान सोहळे सगळं कांही व्यवस्थित करता. पण, दुसऱ्या दिवसा पासून तुम्ही माझ्या शिवबा राजाचे सर्व विचार विसरता रे. नको अशी जयंती साजरी करू. जयंती साजरी करावयाचीच आहे तर मग असं प्रण घ्या. की, ''मी छत्रपती शिवाजी महाराज यांना काळजातून मानतो. मी,





त्यांच्या विचारांवर चालत राहीन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरातील माता-भगिनींची मी सर्वतोपरी काळजी घेईन, स्त्री जातीचा सर्वोच्च मान ठेवीन, गोरगरीबांना मदत करीन, बलात्कार करणाऱ्यास कठोर शिक्षा देईन. मी माझ्या ''छत्रपती शिवाजी महाराज'' यांच्या संत-महात्मे यांच्या विचारांनी नटलेल्या, सजलेल्या महाराष्ट्राची मनापासून काळजी घेईन. मग बघा कसा खळखळून हसेल माझा शिवबा. लोकहो ! शिवबाने खुप दिलंय आपल्याला. त्याचं जतन करूया.

महाराष्ट्राला लाभलेली फार जुनी परंपरा, महाराष्ट्राला देणगी म्हणून मिळालेले थोर अशी संत-महात्मे, विविधतेने नटलेली, सजलेली महाराष्ट्राची संस्कृती, खानपान पद्धतीतील पुरणपोळीचा साज, वेशभुषेतील नऊवारीचा साज, विविध सणवार, अतिउच्च कोटीचा इतिहास, त्या इतिहासाच्या पाऊलखुणा, फार जुनी वटवृक्ष, पुरातन गड किल्ले, आपल्या शिवबाच्या महाराष्ट्राची शान ''मायबोली मराठी''. हे सगळं सौन्दर्य महाराष्ट्रात आहे. माझ्या शिवबाच्या मराठा, हिंदवी स्वराज्याची, साम्राज्याची भगवी पताका सदैव अशीच आसमंतात फडकत ठेवा.

लोकहो ! गोदावरी, भीमा, नर्मदा, कृष्णा या नद्या वाहताना सुद्धा ''जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा'' हे गीत गात वाहतात. आजही सह्याद्रीच्या कड्या-कपारी मधून, दऱ्या-खोऱ्यातून, काळ्या मातीतून, झाडे, वेली, पाने फुलातून एकच निनाद घुमतो. ''जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा''.

जय महाराष्ट्र जय शिवराय !
जय महाराष्ट्र जय शिवराय !



## जात्यावरच्या ओव्या......

अशी तापली दुपार
चिटपाखरू दिसेना
सूर्यदेवाची गरमी
नही कुणाला सोसेना ||६२१||

अशी तापली दुपार
गेले दुर वाटसरू
वाटेवरच घर भाऊ
पाणपोई कर सुरू ||६२२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २५

ज्योतिर्मय साहित्य

मना वीट मानू नको बोलण्याचा ।
पुढे मागुता राम जोडेल कैचा ? ।
सुखाची घडी लोटता दुःख आहे ।
पुढे सर्व जाईल काही न राहे ।।२५।।

अर्थ : हे मना, माझ्या या बोलण्याचाएकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगण्याचा – तू कंटाळा मानू नकोस. कारण तसे झाले तर ज्या भगवंतप्राप्तीसाठी तू प्रयत्न करीत आहेस, तो राम तुला कसा प्राप्त होईल? या संसारात सुख-दुःखाचे चक्र अखंड सुरू असते. सुखाचा क्षण संपला की दुःख येतेच. आणि शेवटी ज्याला तू सुख मानतोस तेही नाश पावणारेच आहे – काहीही शाश्वत राहात नाही.



विवेचन : या श्लोकात समर्थांची लोककल्याणाची विलक्षण तळमळ पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवते. आपण वारंवार सांगत असलेला उपदेश ऐकून लोकांना कंटाळा येऊ शकतो, याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच ते प्रेमाने सांगतात –


''माझ्या बोलण्याचा वीट मानू नकोस.''

आपल्या व्यवहारातही असेच घडते. कोणी आपल्या हितासाठी एखादी गोष्ट सांगितली, उपदेश केला तर तो आपल्याला लगेच पटत नाही. उलट, आपले भले व्हावे या उद्देशाने स्पष्ट बोलणाऱ्या व्यक्तीपासून आपण दूर राहण्याचा प्रयत्न करतो. अशा व्यक्तीबद्दल अनेकदा नकारात्मक मत तयार केले जाते –

''तो खूप स्पष्टवक्ता आहे'', ''तो नेहमी नकारात्मकच बोलतो'', ''त्याचे ऐकले तर व्यवहार कसा करायचा?''

परंतु सत्य हे असे आहे की अप्रिय पण हितकारक बोलणारा माणूस दुर्मिळ असतो, आणि त्याचे ऐकणारा त्याहूनही दुर्मिळ !

संसारात सुख आणि दुःख यांचे चक्र अखंड चालू असते. सुखाचा काळ संपला की दुःख येणारचही अटळ गोष्ट आहे. एखादा माणूस मोठ्या पदावर पोहोचतोआमदार, खासदार किंवा मंत्री होतो. पण त्या सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करण्याऐवजी तो स्वतःच्या स्वार्थासाठी करतो. सत्तेची नशा चढते. परंतु एक दिवस सत्ता जाते, आणि त्याला वास्तवाला सामोरे जावे लागते. **(क्रमशः)**







## सुविचार - प्रकाश




प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

नको परधर्माचा द्वेष मच्छर
ही सर्व धर्मग्रंथांची शिकवण
नकोस व धर्माचा दुराभिमान
सर्वधर्म सहिष्णुतेची करू रुजवण

वाचन चिंतन वर्णन करून
ही सार जाणून घ्यावे सर्व धर्माचे
सर्वधर्मसमभावाची शिकवण देऊनी
आदर्श व्यक्तित्व घडवावे बालकांचे

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### ♦चुका♦

मागील अंकावरून......

तुमची इच्छा नसेल तर तुम्ही ते अन्न कुत्र्याला खाऊ घालू शकता.तुमची जशी मर्जी असेल त्याप्रमाणे करा. त्या गुरुने यांना कालांतराने उपदेश केला, व आपल्या नंतर गुरुस्थानी सुद्धा बसवले. ते माझे मित्र एकदा सांगू लागले की, मला माझ्या गुरुने अशी शिकवण दिली आहे की, रस्त्याने कोठे दिंडी, पालखी जात असेल तर, त्या देवतांचे दर्शन घ्यावे. खिशातले थोडे पैसे तेथे समर्पित करावेत. व त्या दिंडी बरोबर चार पावले का होईना सोबत चालत जावे. काय माहित? अशा दिंडीत कोणी महात्मा सोबत असेल. त्याची दिव्य किरणे तुम्हाला प्राप्त करून घेता येतील. गुरुच्या या शिकवणीनुसार हे माझे मित्र, मुस्लिम असूनही त्यांना रस्त्यात दिसणाऱ्या प्रत्येक पालखीचे दर्शन घेत होते.

शेगावहून पंढरपूरला जाणारी शेगावच्या गजानन महाराजांची दिंडी परभणीहून जात असते. माझ्या या मित्राला पहिले दिवशी ही दिंडी वसमत रोडवर येताना दिसली. त्यांच्या गुरुच्या आदेशाप्रमाणे त्यांनी सायकलवरून उतरून दिंडी मध्ये गेले. गजानन महाराजांचे दर्शन घेतले. रुपया दोन रुपये दानपेटीत टाकले व चार-सहा पावले दिंडी बरोबर सोबत चालले. तीच दिंडी त्यांना काही तासानंतर परभणीत दिसली. पुन्हा त्यांनी तेच केले. दिंडीचा मुक्काम परभणीत एक दिवस असतो. दुसरे दिवशी पुन्हा तिसऱ्यांदा त्यांच्या रस्त्यात ही दिंडी येताना दिसली. त्यांनी पुन्हा तिचे दर्शन घेतले. या दिंडीच्या मार्गस्थ होण्या नंतर या मित्राच्या मनात असा भाव निर्माण झाला की, आपल्या वागण्यात काहीतरी मोठी चूक निश्चितपणे झाली असणार, की आपल्याला तीन वेळेस दिंडीचे दर्शन घ्यावे लागले.

क्रमशः........

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### ♦प्रेरणा आणि दिशा हवी

मित्रांनो, आज थोडं मी तुम्हाला मनातलं सांगतो,
प्रत्येकाला जीवनात सुख-समाधान, प्रगती व्हावी असे वाटते.. म्हणजे ही आपली ईच्छा, मनातून येणारी प्रेरणा ती म्हणते, "हो,तू करशील."
पण इथेच होईल की नाही, करू का नको. असा विचार येतो, पण हे एक पाण्याच्या प्रवाहासारखं आहे.. त्या पाण्याची दिशा आपल्याला ठरवावी लागते. म्हणून हे समजून घेणे क्रमप्राप्त आहे. त्या प्रेरणेबरोबर विवेक व समज पाहिजे, हुशारी, तयारी
पाहिजे, जी अनुभवातून मिळते, मिळविता येते!म्हणजे योग्य दिशेने जाणे आपले प्रयत्न ठरवतात. तर नुकसान, अपमान, भिती सोडून विवेकाने पुढे गेले तर कर्माचे फल मिळते. म्हणून प्रेरणा मिळणे महत्वाचे आहे नंतर प्रयत्न करणे आणि त्या नुसार वागणे म्हणजे दिशा मिळणे, असे हे चक्र आहे, व प्रयत्नाती परमेश्वर" ही संतवाणी आहे. म्हणून श्रीकृष्णानेही गीतेत हाच योग सांगितला आहे.. तर आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग..




## शरीराला आवश्यक असणाऱ्या खनिजा विषयी

ज्योतिर्मय साहित्य

कॅल्शिअम कशात असतं?

शेंगदाणे, तीळ, दूध, खोबरं, मुळा, कोबी. ज्वारी, राजगिरा, खरबूज, खजूर.

कमतरतेमुळे काय होतं?

हृदयरोग, ऑस्टियोपोरोसिस, दंतरोग, केस गळणे.

कार्य काय असतं?

शरीरातील सर्वात मुख्य खनिजं असून ते हाडांची मजबुती आणि शरीराच्या निर्मितीसाठी आवश्यक असतं.

लोह कशात असतं?

खजूर, अंजीर, मनुका, सफरचंद, डाळिंब, पालक, सीताफळ, उस, बोर, मध, पपई आणि मेथी.

कमतरतेमुळे काय होतं?

शरीरात रक्ताची कमतरता भासते. अशक्तपणा, कावीळ किंवा पोटात मुरडा येतो.

कार्य काय असतं?

शरीराच्या वाढीसाठी अतिशय आवश्यक असते.

सोडिअम कशात असतं?

मीठ, पाणी, बटाटा, आलं, लसूण, कांदा, मिरची, पालक, सफरचंद, कारलं.

कमतरतेमुळे काय होतं?

रक्तदाबाशी निगडित समस्या, निद्रानाश, अंगदुखी, अपचन, मूळव्याधीसारखे आजार, मोतीबिंदू, बहिरेपणा, हात अणि पाय कडक होणे.

कार्य काय असतं?

शरीराला आवश्यक असणारी पाचक रसायनाची निर्मिती करतात, त्याचप्रमाणे शरीरात होणारा गॅस नष्ट होतो.

आयोडिन कशात असतं?

शिंघाडा, काकडी, कोबी, राजगिरा, शतावरी, मीठ आणि लसूण.

कमतरतेमुळे काय होतं?

थायरॉइडची समस्या, केस गळणे, डिप्रेशन किंवा बैचेनी येणे.

कार्य काय असतं?

शरीरात उत्पन्न होणाऱ्या विषारी पदार्थापासून मेंदूला बचावण्याचं काम करतो.

पोटॅशिअम कशात असतं? सर्व प्रकारची धान्य, डाळ, संत्र, अननस, केळं, बटाटा, लिंबू, बदाम.)

कमतरतेमुळे काय होतं?

ॲसिडिटी, त्वचेवर सुरकुत्या किंवा मुरुमं येणं, त्वचा रोग, केस पिकणे.

कार्य काय असतं?

शरीरात तंतू आणि यकृत यांना सुरळत ठेवण्याचं कार्य करतं.

फॉस्फरस कशात असतं?

दूध, पनीर, डाळी, कांदा, टोमॅटो, गाजर, जांभळं, पेरू, काजू, बदाम, बाजरी आणि चणे.

कमतरतेमुळे काय होतं?

ऑस्टिओपोरोसिस, गतिमंद होणे, मानसिक थकवा, दंत रोग.

कार्य काय असतं?

मेंदूला ताजंतवानं ठेवण्याचं काम हे खनिजं करतं.

सिलिकॉन कशात असतं?

गहू, पालक, तांदूळ, कोबी, काकडी, मध,

कमतरतेमुळे काय होतं?

कॅन्सर, त्वचारोग, बहिरेपणा, केस गळणे.

कार्य काय असतं?

जननेंद्रियांची कार्यक्षमता वाढवून शरीरातील तंतूना मजबूत करतात.

मॅग्नेशिअम कशात असतं? बाजरी, बीट, खजूर, सोयाबीन, दूध, लीची, कारलं.

कमतरतेमुळे काय होतं?

उदास होणे, आळस येणे, तणाव असणे, झोप न लागणे, बैचेनी, सोरायसिस, फोडं, नपुंसकता किंवा वांझपणा. **(क्रमशः)**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

विषय : माझे गुरु

आई असे खरा
पहिला माझा गुरु
चरणी नमन करते
देते हात हाती
सुख-दुःखात सदा
प्रेमाची नाती जपते

बाबा माझे गुरु
उभे खंबीर पाठीशी
जीवनाचा ते
शिल्पकार
कडवे बोल ओठी
अंतरी असे माया
नेहमी शब्दांचा आधार

# सासवडच्या वाघिरे महाविद्यालयास उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

सासवड - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती मार्फत दिला जाणारा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे महाविद्यालय सासवडला, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.सुदाम शेळके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे येथे संपन्न झालेल्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या द्वितीय सभेत हा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना क्रीडा संचालक डॉ.सुदाम शेळके यांनी, ''शारीरिक शिक्षण संचालक अनेक आव्हाने पेलत खेळाडूंसाठी रात्रंदिवस मेहनत घेत असतात. स्पर्धेसाठी भारतभर फिरताना आकस्मित आलेल्या अनेक समस्यांना सामोरे जातात. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, प्रकुलगुरू, क्रीडा विभाग व सर्व कर्मचारी अश्या सर्व क्रीडा संचालकांच्या मागे खंबीरपणे उभे आहेत.'' शैक्षणिक वर्षातील सर्वाधिक ३०५ गुणांक मिळवून वाघिरे महाविद्यालयाने ह्या वर्षी पुरस्कार मिळवित बाजी मारली. पुरस्कार वितरण प्रसंगी प्रसंगी डॉ.रमेश गायकवाड, वीरसिंग रणशिंग, महेशबापू ढमढेरे, डॉ. अर्जुन मुसमाडे, डॉ.अमेय काळे, डॉ. सुहास बहिरट, डॉ.अक्षय काशिद आदी मान्यवर उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ.संजय झगडे, समन्वयक डॉ.नरसिंग गिरी, डॉ. विजय घारे, डॉ.तुषार घोरपडे, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांनी पुरस्कार स्वीकारला. वाघिरे महाविद्यालयास पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव एड. संदीप कदम, खजिनदार एड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम. पवार, सहसचिव प्रशासन ए.एम.जाधव व क्रीडा अधिकारी श्याम भोसले यांनी महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व खेळाडूंचे अभिनंदन करून आनंद व्यक्त केला.



# महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या निवडणुकीत प्लास्टिक सर्जन डॉ. उज्वला दहिफळे यांचा दणदणीत विजय

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - दि. २६ एप्रिल रोजी ही निवडणूक पार पडली होती, तर काल आणि आज मतमोजणी प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत राज्यभरातून एकूण ६० उमेदवार रिंगणात उतरले होते. अत्यंत चुरशीच्या लढतीत डॉ. उज्वला कराड दहिफळे यांनी प्रभावी कामगिरी करत मतदारांचा विश्वास संपादन केला आणि विजय मिळवला.

या विजयानंतर बोलताना डॉ. उज्वला कराड दहिफळे म्हणाल्या, ''हा विजय माझा एकटीचा नसून सर्व वैद्यकीय व्यवसायिकांच्या एकजुटीचा आहे. मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाचे फलित करणार असून, भविष्यात वैद्यकीय व्यवसायिकांच्या हक्कांसाठी मी नेहमीच लढत राहणार आहे.''

डॉ. उज्वला कराड दहिफळे या छत्रपती संभाजीनगर मधील एक प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन असून, त्यांच्या वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक कार्यातही त्या सक्रिय आहेत. त्यांच्या निवडीमुळे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये मराठवाड्याचे प्रतिनिधित्व अधिक सक्षम होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या विजयाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील काळात त्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रश्नांवर प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# स्वरचंद्रिका पद्मजा

ज्योतिर्मय साहित्य

स्वरचंद्रिका म्हट्ले क पद्मश्री पद्मजी फेणाणी जोगळेकर यांचेच नाव डोळ्यांसमोर येते. जसे गानसरस्वती म्हटले की किशोरीताई आमोणकर दृष्टीस पडतात. गान कोकिळा म्हटले की, लता मंगेशकरांची मूर्ती नजरेसमोर येते. एखादे विशेषण म्हटले की संबंधित व्यक्ती नजरेसमोरून तरळून जाते.

स्वरचंद्रिका पद्मजाताई दोन मे २०२६ रोजी पणजीत मराठी साहित्य संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून येत आहेत. कुणी म्हणेल एक गायिका साहित्य संमेलनाची अध्यक्ष कशी? तर पद्मजाताईंचे वाचन अफाट आहे. लेखन कौशल्यही विशेष आहे. पद्मजाताईंची अलौकिक संगीत रचना म्हणजे अक्कलकोट स्वामींचा तारक मंत्र. तो त्या इतक्या तल्लीन होऊन म्हणतात की भान हरपून जाते आपले. प्रत्यक्ष स्वामी समर्थ महाराज समोर बसले आहेत आणि आपण तारक मंत्र म्हणतो आहोत, असा भास होतो. त्यातील शब्दन शब्द भक्ती आणि शरणागतीची प्रचिती देतो. त्या भक्तिभावाने तो तारकमंत्र म्हटला तर आपली मनोकामना स्वामींना कळून ती पूर्णही होईल. इतका शक्तिशाली मंत्र आहे.

पद्मजाताईंच्या गाण्याची तारीख दस्तुरखुद्द कुसुमाग्रजांनी केली आहे. त्याचप्रमाणे भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयींच्या मेरी इक्क्यावन कवितांचे त्यांनी इतक्या समर्थपणे गायन केले आहे. स्वतः अटलबिहारी वाजपेयीजी तल्लीन होऊन ऐकत होते. त्यांच्या स्वरातील आर्तता व भावनाप्रधानता मान डोलावण्यास भाग पाडतात.

दुसरे माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांच्याही कवितांचे गायन पद्मजाताईंनी केले आहे. एक रास्वसंघाचा खदा कार्यकर्ता व दुसरा तळागाळातील लोकांनी आपलेसे मानणारा. किती विरोधाभास आहे. परंतु दोघांही महान व्यक्तींच्या कविता पद्मजाताईंनी गाऊन अजरामर केल्या आहेत.



शास्त्रीय गायनात व सुगम गायनात पद्मजाताईंचा हातखंडा आहे. इतकेच नव्हे तर मराठी चित्रपटसृष्टीतील काही गीते त्यांनी गायली आहेत. ना. धों. महानोरांची गीते त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने गायली आहेत. दूरदर्शनची ख्याती ऐंशीच्या दशकातील. त्या काळी गझल गायकीमध्ये दोन नावे प्रामुख्याने गाजत होती. एक पद्मजाताई व दुसऱ्या पिनाज मसानी. आता दूरदर्शनचा जमाना संपला आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील कर्णकर्श गाण्यांचा जमाना आला आहे. तरीही पद्मजाताईंचे गाणे लागले की, आपण देहभान हरपून जातो.

सुरेश भट हे कलंदर कलाकार. त्यांचे केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली हे अगदी वेगळ्या ढंगाचे गाणे. खुद्द आशाताई भोसले यांनी या गीताबद्दल पद्मजाताईंची पाठ थोपाटली आहे. लव लव करी पातं हे गीतही त्यांनी आर्ततेने गायले आहे.

प. जसराज यांच्या कडे शास्त्रीय संगीत शिकण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे. पं. हृदयनाथ मंगेशकरांकडे त्यांनी संगीताचे धडे गिरवले. प. रामनारायणजी यांच्याकडेही त्यांनी संगीताची संथा घेतली.

त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मियाँ तानसेन पुरस्कार माणिक वर्मा चतुरस्र गायिका पुरस्कार , भारत निर्माण पुरस्कार, एस. डी. बर्मन पुरस्कार आदी मानाचे पुरस्कार आहेत. त्या सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून अध्यात्म आणि वैचारिक लेखन तसेच स्तंभ लेखनही केले आहे.

लता मंगेशकरांनंतर श्रेष्ठ गायिका कोण असे विचारले असता, हृदयनाथांनी पद्मजाताईंचे नाव सांगितले. गेल्या वर्षी मुंबईला त्यांची भेट झाली. आता दोन मे २०२६ रोजी पणजीत इन्स्टिट्युट मिनेझिस ब्रागांझात आमच्या साहित्यलेणी प्रतिष्ठानच्या मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष आहेत, हे आमचे अहोभाग्यच म्हणायचे. या संमेलनात त्यांची प्रकट मुलाखत आहे. त्यांचा जीवनप्रवास ऐकायला मिळणार आहे.


प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

पद्मजाताईंचे गाणे ऐकायला मिळणे हे कुणाच्या नशिबी नसते. त्या काही मराठी  व कोकणी गीते या संमेलनात गाणार आहेत

पद्मजाताईंचे गाणे परदेशातही गाजते आहे. त्यांच्या अनेक मैफली परदेशात होत असतात. त्यांचे गाणे ऐकणे स्वर्गसुखाचा अनुभव असतो. अनेक हिंदी मराठी गाणी त्यांनी गायली आहेत. त्यांच्या आवाजात मधुर सूर असतात. मनाला मोहिनी घालणारे ते सूर असतात.

बाबा आमटे यांच्या आनंदवनात, अहिल्यानगरातील अपंगासाठी स्नेहालय, कमला मेहता अंधशाळा आदी संस्थांसाठी गायन केले आहे. त्यांनी अनेक वेळा रक्तदानही केले आहे.












# जय जय महाराष्ट्र माझा....

ज्योतिर्मय साहित्य

गर्जा महाराष्ट्र माझा... जय जय महाराष्ट्र माझा...किंवा राकट देशा.. कणखर देशा.. दगडांच्या देशा.. नाजूक देशा.. कोमल देशा.. फुलांच्याही देशा. अशा शब्दात ज्या भूमीचे वर्णन केले जाते त्या महान महाराष्ट्राचा आज जन्मदिवस आहे. महाराष्ट्र ही संतांची वीरांची आणि समाज सुधारकांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच मातीत स्वराज्य उभारले. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज,. यांसारख्या संतांनी भक्तीचा मार्ग दाखवला, तर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, आणि अनेक महापुरुषांनी परिवर्तनाची दिशा दिली.

१ मे हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो, कारण या दिवशी महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन असे दोन महत्त्वाचे प्रसंग एकत्र येतात.

१. महाराष्ट्र दिन..

१ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना कायद्यानुसार द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली.

हा दिवस मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीचा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांच्या बलिदानाचा गौरव करण्यासाठी साजरा केला जातो.

राज्यभर शासकीय सुट्टी असते. मुंबईतील शिवाजी पार्क येथे मुख्य परेड आणि ध्वजारोहण सोहळा आयोजित केला जातो.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळाले; मात्र त्या वेळी महाराष्ट्र स्वतंत्र नव्हता ! भारत स्वतंत्र झाला, तेव्हा देशाचा नकाशा पूर्णपणे वेगळा होता. पुढे हळूहळू देशातील राज्ये भाषा आणि प्रदेश यांच्या आधारावर वेगळी झाली. त्यानुसार १ मे १९६० या दिवशी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे हा दिवस 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक प्रांतीय राज्ये मुंबई प्रांतात विलीन करण्यात आली. त्या वेळी मुंबई प्रांतात गुजराती आणि मराठी भाषा बोलणारे लोक रहात होते. त्याच वेळी भाषावार प्रांत रचनेची मागणी जोर धरू लागली. गुजराती भाषिक स्वतःच्या वेगळ्या राज्याची, तर मराठी भाषिक नागरिकही स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली. या आंदोलनाचा परिणाम म्हणून १९६० मध्ये 'मुंबई पुनर्रचना कायद्यां'तर्गत महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली.




२१ नोव्हेंबर १९५६ या दिवशी फ्लोरा फाऊंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते; कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले होते, त्यामुळे मराठी माणसे चिडली होती. या निर्णयाचा सर्वत्र छोट्या-मोठ्या सभांमधून निषेध होत होता. या संघटितपणामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनसमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले.

त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून आणि दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत फ्लोरा फाऊंटनकडे जमला. मोर्चा उधळून लावण्यासाठी पोलिसांची शक्ती वापरून लाठीमार करण्यात आला; मात्र अढळ सत्याग्रहींमुळे पोलिसांचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले. परिणामी मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे पोलिसांना गोळीबाराचा आदेश देण्यात आला. नंतर गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले.

या हुतात्म्यांचे बलीदान आणि मराठी माणसाचे आंदोलन यांमुळे अखेर सरकारने नमते घेऊन १ मे १९६० मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर १९६५ मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली.

(क्रमशः)

# रम्य आमचा महाराष्ट्र

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्र....... या महाराष्ट्राला रम्य म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आमचा महाराष्ट्र रमणीय आहे. इथे सातशे वीस किमीचा सागरकिनारा लाभलेला आहे. सागराच्या काठावरुन फिरतांना जणू आपण सागरातच फिरत आहोत असं वाटायला लागतं. हा आमचा महाराष्ट्र पाहायला विदेशीही दुरदूरुन येत असतात.

इथे ज्याप्रमाणे सागरकिनारा आहे. त्याचप्रमाणे त्याचप्रमाणे किल्लेही आहेत. हे किल्ले आजूबाजूला पसरलेले आहेत. काही शिवरायांनी बांधले तर काही आताच्या मंडळींनी बांधले. शिवरायांच्या काळातील बांधकाम तर एवढं सुंदर आहे की त्याची आपण कल्पनाही करु शकत नाही. त्यांनी तर समुद्रावरील शत्रुंवर वचक बसविण्यासाठी सिंधुदुर्ग विजयदुर्ग हे किल्ले समुद्रावरच बांधले. खरं तर शिवराय हे राजे जरी असले तरी त्यांच्याकडे अभियंत्याचा गुण होताच. ज्या गडावर पाणी अजिबात मुरत नसतं, त्या गडावर त्यांनी विहिरी खोदल्या. तसेच पावसाचे पाणी याच विहिरीत गोळा करण्याची सोय केली. त्यांनी बांधलेल्या गडावर विपुल प्रमाणात पाणी असायचं. आता साधं सपाट भागात पाणी मिळत नाही.

या महाराष्ट्रात छोट्या छोट्या नद्याही भरपूर आहेत. काही नद्यात तर आजही भरपूर पाणी असतं. हे पाणी उन्हाळ्यातही आटत नाही. कृष्णा, वैनगंगा, कन्हान आणि सर्वात जास्त लांब नदी गोदावरी. गोदावरी तर महाराष्ट्राचा प्राणच आहे.या बाराही महिने वाहणा-या नद्यांनी परीसरातील भाग एवढा सुपीक बनवला की महाराष्ट्रात तरी धनधान्याची कोणाला कमी पडत नाही. तसं पाहता नद्या अखख्या महाराष्ट्राला पोषत आहेत.

कोकणातून फिरतांना अधिकच रम्यता अनुभवास येते. आजुबाजूची नारळ पोफळीची झाडं वाकून आपल्याला नमस्कार करतात. याशिवाय नारळ फणसाची झाडं भरपूर आहे. गावातील घरं ही सतत पडणा-या पावसाला झेलण्यासाठी उतरत्या छपराची आहेत.तसेच शहरातही घरं उतरत्याच छपराची आहेत. येथील प्रत्येक घरासमोर दोन चार नारळाची व सुपारीची झाडं



नक्कीच दृष्टीस पडतात. तसेच महाबळेश्वरच्या भागांतील अरुंद वाटेवरुन चालतांना मनात धडकी भरल्याशिवाय राहात नाही. महाबळेश्वरचा भाग तर स्वर्गच वाटतो. इथे पडणारा पाऊस हा पाहण्यासारखा आहे. माणसाला माणूस दिसणार नाही असं इथं धुकं पडतं. नव्हे तर या धुक्याकडे पाहतांना स्वर्गसुखाचा आनंद मिळतो. वातावरण आल्हाददायक असल्यामुळे येथील वर्णन कोणत्याही लेखकाला लिहिल्याशिवाय राहावत नाही. येथे दररोज हजारो पर्यटक येत असून काहींचे मोठमोठे बंगलेही आहेत. वन्यप्राण्यांबरोबरच पांढराशुभ्र धुके हे या भागाचं आकर्षण आहे.

महाराष्ट्रात लेण्या तर एवढ्या आहेत की त्या पाहायला महिना लागेल. शिवाय या लेण्यात एवढं कोरीव काम केलेलं आहे. ते कोरीव काम पाहता असं वाटायला लागतं की

अंकुश शिंगाडे
नागपूर ९३७३३५९४५०

असे कसे शिल्पकार होवून गेले. अखखा पाहाड खोदून बनवलेली विरहाची लेणी किंवा अखख्या पर्वताला पोखरुन बनविलेली अजिंठा लेणी पाहतांना स्वर्गसुखाचा आनंद मिळतो. या लेण्यांतील जशा भींती कोरीव दिसतात. तसंच छतही कोरीव दिसतं. या छताला असलेले रंग आज एवढी वर्ष होवूनही अजूनही चिपकून आहेत. नाहीतर आजचे रंग. आजचे रंग दोन चार वर्षात पोपडे पाडतात व निघून जातात. पुर्ण गोलाकार पर्वत पोखरुन बौद्ध बांधवासाठी अजिंठा वेरुळची लेणी बांधण्यात आली.तसेच मुंबईला लागून असलेली एलिफंटा लेणी ही देखील स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच उस्मानाबादचीही धाराशिवची लेणी पाहण्यासारखी आहे.

कोकण फिरतांना तर फारच मजा आल्याशिवाय राहात नाही. मधातून डांबरी ओबडधोबड रस्ता. सतत पडलेल्या पावसाने रस्त्यावर काहीसे खोल गड्डे पडलेले दिसतात.तसेच रस्ते मुरमाडी असल्याने सिंगल प्रत टाकलेले डांबराचे रस्ते दिसतात. नव्हे तर या रस्त्याच्या बाजूला मोठमोठी नारळाची झाडं, पोपळीची झाडं, ताडाची झाडं नव्हे तर आंब्या फणसाची झाडं मनात तरलता निर्माण करतात.अतिशय मन मोहून टाकतील अशी सुपारीची झाडंही याच महाराष्ट्रात आहेत.

कुणालाही गर्व वाटेल असा सुजलाम सुफलाम आमचा महाराष्ट्र या महाराष्ट्रात मंदीरांची संख्या काही कमी नाही. गाव तिथे मंदीर आहे.काही गावातील मंदीर एवढे वाखाणण्याजोगे आहेत की तिथे गावाची शहरं झाली. तिथे मंदीरातील लोक मंदीरामुळंच पोट भरतात.तुळजापूर, पंढरपूर, देहू ,आळंदी, अष्टविनायक, ज्योतीर्लिंग, जेजूरी, शिरडी, शेगाव, अक्कलकोट, आजनसरा, रामटेक, ज्योतीबा, माहूर, स्वप्नशृंगी, गणपतीपुळे, कळंब, नागपूर अशी कितीतरी ठिकाणे आज मंदीरामुळं प्रसिद्ध झाली आहेत.इथे भरपूर अभयारण्य असून ताडोबा आणि भीमाशंकर हे त्यापैकीच एक. इथे काही सर्पोद्यानही प्रसिद्ध आहेत.पुण्यातील कात्रजचं सर्पो द्यान किंवा छ. संभाजीनगर मधील बस स्टॅन्ड जवळील सर्पोद्यान विशेष पाहण्यासारखं आहे. नागपूरातील महाराजबागही त्या दृष्टीनं महत्वाचं आहे.

येथील काही चर्चही पाहण्यासारखे असले तरी पर्यटकांसाठी इथले चर्च खुले नाहीत. मात्र अमृतसर सारखा गुरुद्वारा आजही नांदेड इथे पाहायला मिळतो. तसेच बौद्ध बांधवासाठी बांधलेली चैत्यभुमी किंवा दिक्षाभुमी किंवा ड्रगनटेंपल आजही याच महाराष्ट्रात आहे. नव्हे तर मुस्लींमांसाठी बांधलेला ताजमहल याच महाराष्ट्रात नागपूर इथे आहे.सहा डिसेंबर, चौदा एप्रील व दस-याला नागपूरमध्ये दिक्षाभुमीला मोठी यात्राच असते.तसेच दरवर्षी जो उरुस भरविण्यात येतो.त्या उरुसमध्ये फार गर्दी असते. अशीच गर्दी हिंदू आणि शिख लोकांच्या मंदीरातही पाहायला मिळते.पंढरपूरचा सावळा विठू तर महाराष्ट्राचं कुलदैवतच समजला जातो.

महाराष्ट्रात जमीनीला आई मानलं जाते.जशी आई आपल्या लेकराला भरभरुन देत असते. तसंच भरभरून ही देखील आई महाराष्ट्राला देत आहे. अमरावतीला पिकणारं पांढरं सोनं आजही संपुर्ण जगाला पोषतं नव्हे तर चंद्रपूरवरुन पश्चिम महाराष्ट्रात जाणारी वीज संपुर्ण महाराष्ट्राला पोषते आहे. जिथे शेतीमाऊली नाही, तिथे आजही कारखाने डौलात उभे आहेत.असा हा महाराष्ट्राचा सुसंपन्न भाग पाहतांना आम्हाला फार मजा वाटत होती. आजुबाजूची नारळ,पोपळीची झाडं आम्हाला खुणावत होती.सांगत होती की इथून परत जावू नका. आज इथे मुक्काम करा. पण मुक्काम कसा करणार. प्रत्येकाला प्रपंच लागलेला असतोच. तसा आम्हालाही लागलेला होता. म्हणून आम्ही आता परतीच्या मार्गावर लागलो होतो.पश्चिम महाराष्ट्रातील हे स्वर्गद्वार सोडून.हे भाग सोडतांना एकीकडे आनंदही होत होता तर दुसरीकडे दुःख. आनंद याचा की इथलं रमणीयत्व पाहायला मिळालं. दुःख याचं की पुन्हा इथे यायला मिळते की नाही. खरंच स्वर्ग नरक काहीही नसून देवाने मांडलेल्या स्वर्ग नरकाच्या भुमिका भ्रामक असाव्यात हे प्रत्यक्षदर्शी महाराष्ट्र पाहतांना अनुभवत होतो. हाच परीसर मला स्वर्गासमान भासत होता.

***

# भगवंत हृदयस्थ आहे

ज्योतिर्मय साहित्य



ही प्रेरणादायी कथा श्रीमद्भागवत महापुराण मधून घेतलेली आहे.

या प्रसंगात काही विशेष गोष्टी दिसतात:

मध्यभागी दिव्य सिंहासनावर वरुणदेव विराजमान आहेत.

एका बाजूला शांत आणि तेजस्वी रूपातील श्रीकृष्ण उभे आहेत, त्यांच्यासोबत बलरामही आहेत.

दुसऱ्या बाजूला नंदबाबा नम्रतेने हात जोडून उभे आहेत.

संपूर्ण वातावरण जलमय आहेचारही बाजूंना मासे, निळा प्रकाश आणि समुद्रासारखे दृश्य, जे वरुणलोकाचे स्वरूप दर्शवते.

श्लोक:

नन्दः स्नातुमुपस्पृष्टो यमुनायां द्विजोत्तम ।
असुरेण गृहीतोऽभूत् वरुणस्याज्ञया तदा ।।

एकदा एकादशीचा उपवास केल्यानंतर, नंद द्वादशीपूर्वीच पहाटे स्नानासाठी यमुनेत उतरले. तो काळ 'असुर बेला' मानला जातो. तेव्हा वरुणदेवांच्या एका सेवकाने नियमभंग झाला असे समजून त्यांना पकडले आणि आपल्या स्वामीच्या लोकात घेऊन गेला.

२. श्रीकृष्णांचा वरुणलोकात प्रवेश

श्लोक:

तं दृष्ट्वा भगवान् कृष्णः पितरं वरुणालये ।
जगाम तत्र भगवान् सर्वलोकनमस्कृतः।।

अर्थ:जेव्हा ब्रजवासियांना नंद अचानक गायब झाल्याचे कळले, तेव्हा सर्वजण घाबरले. तेव्हा श्रीकृष्णांनी परिस्थिती ओळखली आणि आपल्या वडिलांना परत आणण्यासाठी त्वरित वरुणलोकात गेले.

३. वरुणदेवांचा नम्र प्रणाम

श्लोक:

दृष्ट्वा तमागतं कृष्णं वरुणः परमाद्भुतम्
।
सस्मितं प्राञ्जलिर्भूत्वा तस्थौ तत्र कृताञ्जलिः।।




अर्थ:जसेच वरुणदेवांनी श्रीकृष्णांना पाहिले, ते ताबडतोब सिंहासनावरून उतरले आणि त्यांच्या चरणी नतमस्तक झाले. त्यांनी आपल्या सेवकाच्या चुकीबद्दल क्षमा मागितली आणि नंदबाबांना सन्मानाने मुक्त केले.

४. नंदबाबांची मुक्तता

श्लोक:

अयं मेऽपराधो भगवन् क्षन्तुमर्हसि सुव्रत ।
अज्ञानाद् भृत्यकृतं दोषं मुक्तोऽयं तव पितामहः।।

अर्थ:

''हे भगवन्! माझा हा अपराध क्षमा करावा. माझ्या सेवकाने अज्ञानाने चूक केली आहे. तुमचे वडील आता मुक्त आहेत.''

ही संपूर्ण घटना आपल्याला सांगते:

भगवंत आपल्या भक्तांसाठी स्वतः पुढे येतात
देवताही त्यांच्या सर्वोच्चत्वाला मान्यता देतात
भक्तीमध्ये भीती नसतेश्रद्धा आणि संरक्षण असते
आध्यात्मिक दृष्टीने विचार केला तर

१. नंद = मन (चित्त)

नंद म्हणजे आपले मन. मन साधे, भक्तिमय असते
पण कधी कधी ते अज्ञानाने नियम चुकवते (जसे असुर बेला)
म्हणजेच: आपण चांगले असलो तरी अज्ञानामुळे चुकतो

२. यमुना = जीवनप्रवाह / भावना

यमुना नदी म्हणजे: आपल्या भावना, संस्कार, जीवनाचा प्रवाह
आपण रोज त्यात ''स्नान'' करतो म्हणजेच अनुभव घेतो

३. 'असुर बेला' = अज्ञानाची वेळ

ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे: ''असुर बेला'' म्हणजे बाहेरची वेळ नाही ती आपल्या आतली अवस्था आहे
जेव्हा: विवेक नसतो जागरूकता कमी असते
आपण सवयीने वागतो तेव्हा आपण असुर बेलामध्ये जगत असतो

४. वरुणाचे सेवक = कर्मबंधन

वरुण यांचे सेवक म्हणजे: आपल्या कर्मांचे नियम
चूक झाली की त्याचे परिणाम येतात
कोणी ''दंड देतो'' असे नाही
आपलेच कर्म आपल्याला ''पकडते''

५. वरुणलोक = अवचेतन

नंदबाबांना जेथे नेले ते ''वरुणलोक'' म्हणजे: आपल्या मनातील खोल स्तर
जिथे भीती, संस्कार, दडलेले अनुभव असतात

६. श्रीकृष्ण = आत्मा / परमचैतन्य

श्रीकृष्ण म्हणजे:
आपल्या आतला साक्षीभाव प्युअर आवेरनेस )
परमसत्य, आत्मा
जेव्हा मन अडकते तेव्हा ''आत्मा'' त्याला मुक्त करतो

७. वरुणाचा नमस्कार = अहंकाराचे शरणागती

वरुणदेवांनी श्रीकृष्णाला वंदन केले याचा अर्थ:
निसर्गाचे नियमही आत्म्यापुढे झुकतात
जेव्हा आत्मज्ञान येते, तेव्हा कर्मबंधन सैल होते
अंतिम ध्यानार्थ (सर्वात महत्त्वाचे)
ही कथा सांगते: मन (नंद) अज्ञानामुळे कर्मात अडकते
आत्मा (कृष्ण) जागृत झाला की तो मुक्त करतो
आणि शेवटी सर्व काही त्या परमचैतन्यापुढे नतमस्तक होते

''भगवंतावर खरे प्रेम आणि श्रद्धा असेल, तर ते प्रत्येक परिस्थितीत आपल्या सोबत उभे राहतात.''

''माझे मन जरी अडकले, तरी माझ्यातील कृष्ण मला मुक्त करणार आहे.''

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने
प्रणत क्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः''
कृतज्ञ मी कृतार्थ मी

# आरती प्रभू-चिंतामणी त्र्यंबक खानोलकर

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

३. नाटके

मराठी रंगभूमीवरही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या नाटकांमध्ये मानसिक ताण, सामाजिक वास्तव आणि मानवी मनाचे गुंतागुंतीचे पैलू दिसतात.

अजगर''
''त्रिशंकू''
''काळोख''
''गंधर्व''

त्यांच्या साहित्याला नंतर प्रचंड मान्यता मिळाली. आज ते मराठी साहित्यातील एक प्रभावी आणि वेगळे व्यक्तिमत्त्व मानले जातात.

जीवनातील संघर्ष

त्यांचे आयुष्य म्हणजे एका कलाकाराची अंतर्गत झुंज होती
अंतर्मनातील एकाकीपणा
सतत चालणारा आत्मशोध
या सर्व गोष्टींनी त्यांच्या लेखनात वेदना आणि गूढता निर्माण केली. त्यांच्या कवितांमध्ये आनंदापेक्षा प्रश्न जास्त आहेतआणि हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

''ये रे घना, ये रे घना'' गीताचा परिचय

ये रे घना ये रे घना हे गीत मराठी साहित्यातील एक अत्यंत लोकप्रिय आणि भावस्पर्शी गीत आहे.

या गीताला संगीत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी दिले असून, ते मधुर स्वरात आशा भोसले यांनी गायले आहे.

हे गीत पावसाच्या प्रतीक्षेचे, निसर्गाच्या आवाहनाचे आणि अंतर्मनाच्या ओलाव्याचे प्रतीक आहे.

निसर्गाशी असलेला अर्थ

या गीताचा पहिला आणि सहज जाणवणारा अर्थ म्हणजे निसर्गाशी असलेली नाळ

''घना'' म्हणजे काळे ढग
पावसाचे आगमन
कोरड्या भूमीला मिळणारे जीवन
ही कविता म्हणजे पावसाला केलेले प्रेमळ आमंत्रण आहे.



धरती तहानलेली आहे, आकाश भरून आले आहे, आणि माणूस त्या पावसाची आतुरतेने वाट पाहतो आहे.

निसर्गाच्या या चक्रामध्ये
पाऊस म्हणजे पुनर्जन्म
ढग म्हणजे आशा
आणि धरती म्हणजे सहनशीलता.
अंतर्मुख करणारा अर्थ

पण या गीताचा खरा गाभा इथेच थांबत नाही.

हे गीत माणसाच्या अंतर्मनाशी संवाद साधते.

मानव जेव्हा यश, प्रसिद्धी, आणि यशाच्या उंच शिखरावर पोहोचतो, तेव्हा तो स्वतःला विसरतो. त्याच्या मनावर अहंकाराचे प्रसिद्धीचे स्वार्थाचे मळभ चढते

अशावेळी कवी म्हणतो हे घणा हे पावसा घाल माझ्या मना मळभ धून काढ

अशा वेळी ''घना'' म्हणजे पाऊस हा एक प्रतीक बनतो

पाऊस म्हणजे शुद्धीकरण
पाऊस म्हणजे आत्मपरीक्षण
पाऊस म्हणजे अहंकार धुऊन टाकणारी शक्ती

या गीतातला पाऊस जणू म्हणतो
''तू कितीही मोठा झाला असशील,
पण तुझी मुळे जमिनीतच आहेत.''
हा पाऊस माणसाला पुन्हा नम्र बनवतो.

तो त्याला आठवण करून देतो की
यश तात्पुरते आहे
प्रसिद्धी क्षणभंगुर आहे
पण माणुसकी शाश्वत आहे
''पाय जमिनीवर असावेत'' गूढ संदेश
या गीताचा अंतर्मुख अर्थ अत्यंत गहिरा आहे

जेव्हा माणूस उंच भरारी घेतो, तेव्हा त्याला वाटते की तो आकाशाचा मालक आहे. पण पाऊस येतो आणि त्याला परत जमिनीवर आणतो.

पावसाचे थेंब म्हणजे जणू निसर्गाचे शब्द
''उंच जा, पण विसरू नकोस

सौ.सुरेखा राजेंद्र शेजवळ
माजी उपशिक्षिका कन्या शाळा सातारा

तू जमिनीचाच आहेस.''
ही जाणीवच माणसाला संतुलित ठेवते

''घना'', ''ये रे''
काळे ढग, ओलसर धरती
यामुळे कविता केवळ वाचली जात नाही, तर अनुभवली जाते.

चिंतामणी त्र्यंबक खानोलकर उर्फ आरती प्रभू हे मराठी साहित्यातील एक विलक्षण आणि अंतर्मुख करणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या लेखनात निसर्ग आणि मानवी मनाचा अद्भुत संगम दिसतो.

''ये रे घना, ये रे घना'' हे गीत त्यांच्या काव्यशक्तीच उत्कृष्ट उदाहरण आहे

जिथे पाऊस केवळ पाणी नाही,
तर तो आत्मशुद्धीचा, नम्रतेचा आणि वास्तवाची जाणीव करून देणारा संदेश आहे.

शेवटची ओळ...
पाऊस जेव्हा कोसळतो,
तेव्हा फक्त धरतीच नाही तर
मनही ओलावते
आणि त्या ओलाव्यात
माणूस स्वतःला पुन्हा शोधतो.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559